पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/५६९/२०१६
दिनांक : १४/१०/२०१६

प्रति,

मा......................................
सदस्य, विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

विषय – पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची पाक्षिक सभा दिनांक २१/१०/२०१६ रोजी आयोजित केलेबाबत...

महोदय / महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची पाक्षिक सभा शुक्रवार दिनांक २१/१०/२०१६ रोजी दुपारी ३.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे, ही विनंती.

मा.कळावे,

आपला विश्वासू,



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत – १) सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

Z:\e drive\Nagersachiv1\New Folder\Ele 2016 sub committee sabhapati.doc

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८.

**मा.विधी समिती सभा**

कार्यपत्रिका क्रमांक – २

दिनांक – २१/१०/२०१६ वेळ – दुपारी ३.०० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची पाक्षिक सभा शुक्रवार दिनांक २१/१०/२०१६ रोजी दुपारी ३.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

----------

अ) दिनांक **०२/०९/२०१६** व **०७/०९/२०१६** रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्रमांक २४)** सभावृत्तांत कायम करणे.

**आ)** दिनांक **१४/१०/२०१६** रोजी झालेल्या विशेष सभेचा **(कार्यपत्रिका क्रमांक १)** सभावृत्तांत कायम करणे.

---------

विषय क्र.१) पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर 'कान-नाक-घसा तज्ञ'अभिनामाची पदे र.रु.१५६००-३९१०० ग्रेड पे ६६०० या वेतनश्रेणीमध्ये शासन मंजूर आहेत. या संवर्गामध्ये रिक्त असणारी पदे सरळसेवा प्रवेशाने भरण्याकामी दि.२८/०७/२०१५ रोजी वर्तमानपत्रात आणि महापालिकेच्या संकेतस्थळावर जाहिरात क्र.२३९/२०१५ प्रसिध्द करुन तसेच महापालिका आस्थापनेवर कार्यरत असलेल्या अर्हताधारक अधिका-यांकडूनही ऑनलाइन अर्ज मागविण्यात आले होते. 'कान-नाक-घसा तज्ञ'पदाकरीता प्राप्त झालेल्या अर्जानुसार उमेदवारांना कोणत्याही कागदपत्रांच्या छाननीशिवाय केवळ उमेदवाराने ऑनलाइन अर्जामध्ये नमूद केलेल्या माहितीच्या आधारे दि.२०/१२/२०१५ रोजी लेखी परीक्षेकरीता पाचारण करण्यात आले होते. सदरच्या लेखी परीक्षेतउमेदवारांनी प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे एकत्रित सर्वसाधारण गुणानुक्रम व प्रवर्गनिहाय गुणानुक्रम यादी यानुसार आरक्षण निहाय संभाव्य निवड क्षेत्रात (Zone of Consideration) येणा-या उमेदवारांची शैक्षणिक अर्हता, अनुभव कालावधी विषयक व इतर कागदपत्रांची तपासणी करण्याकरीता दि.२८/०३/२०१६ रोजी पाचारण करण्यात आले होते. उमेदवारांकडून प्राप्त झालेली शैक्षणिक अर्हता, अनुभव कालावधी आणि इतर कागदपत्रांचे आधारे ' कान-नाक-घसा तज्ञ ' या संवर्गाकरीता आरक्षणनिहाय गुणानुक्रमे संभाव्य निवड क्षेत्रात (Zone of Consideration) येणा-या उमेदवारांचे गुण व त्यांच्या इतर माहितीनुसार

उमेदवारांची प्रवर्गनिहाय गुणानुक्रमे निवड यादी व प्रतिक्षा यादी तयार करण्याकरीता दि.२१/०७/२०१६ रोजी कर्मचारी निवड समिती आयोजित करण्यात आली होती. प्रस्तुतच्या कर्मचारी निवड समितीने उमेदवारांचे लेखी परीक्षेतील गुण, धारण केलेली शैक्षणिक अर्हता, अनुभव कालावधी आणि इतर तपशील पडताळून रिक्त पदसंख्या, अनुशेष/आरक्षण व गुणानुक्रम विचारात घेऊन निवड यादीवरील डॉ.तेलंग वृषाली राहूल यांना खुल्या प्रवर्गातून पे बॅन्ड र.रु.१५६००-३९१०० ग्रेड पे ६६०० या वेतनश्रेणीमध्ये ' कान – नाक - घसा तज्ञ ' या पदावर मा.विधी/महापालिका सभेच्या मान्यतेअधीन नियुक्ती देण्यास सर्वानुमते शिफारस केली आहे. डॉ. तेलंग वृषाली राहूल यांना वेतनश्रेणी र.रु.१५६००-३९१०० ग्रेड पे ६६०० मध्ये ' कान – नाक - घसा तज्ञ ' अभिनामाचे पदावर नियुक्ती देण्यास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

विषय क्र.२) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची सार्वत्रिक निवडणूक २०१७ मध्ये होत आहे. सदर महानगरपालिकेच्या निवडणूकीकरीता मा.भारत निवडणूक आयोगाकडील विधानसभेच्या याद्यां वरुन महापालिकेच्या मतदार याद्या तयार कण्यात येत असतात. महानगरपालिका कार्यक्षेत्रात २०५-चिंचवड, २०६-पिंपरी, २०७-भोसरी तसेच २०३-भोर विधानसभा अंतर्गत ताथवडे गाव हे भाग समाविष्ट आहेत. याकामी दिनांक - ०१/०१/२०१७ रोजी ज्या नागरिकांचे वय १८ वर्षे पूर्ण होत आहे. अशा नागरिकांना आपले नाव मतदार यादीत मतदार म्हणून नोंदविता येणार आहे. तसेच कोणताही पात्र नागरिक अथवा पात्र मतदार मतदार यादीत नाव नाही म्हणून मतदानापासून वंचित राहणार नाही याकामी मा.भारत निवडणूक आयोगातर्फे **मतदार नोंदणी अभियान कार्यक्रम दिनांक - १५ सप्टेंबर २०१६ ते दिनांक - १४ ऑक्टोबर, २०१६ या कालावधीमध्ये आयोजित करण्यात आलेले आहे. तसेच दिनांक १८/०९/२०१६ (रविवार) व दिनांक ०९/१०/२०१६ (रविवार) या दोन्ही दिवशी विशेष मोहिमेचे आयोजन करणेत आलेले आहे.** या कार्यक्रमाअंतर्गत पात्र नागरिकांना त्यांचे नाव मतदार यादीत नोंदविणे तसेच मतदार यादीतील नाव, वय, लिंग, इ. चुकांची दुरुस्ती करणे तसेच मयत, दुबार, स्थालांतरण इत्यादि नावे वगळणी करण्याबाबत कार्यवाही करण्यात येणार आहे. त्याकामी महापालिकेच्या सर्व क्षेत्रीय कार्यालये तसेच शहरातील १४ महाविद्यालयांमध्ये ०१ ऑगस्ट २०१६ पासून मतदार सहायता केंद्र सुरु करण्यात आलेली आहेत. त्यांचेमार्फत फॉर्म नं.६ नवीन नोंदणी, फॉर्म नं.७ नाव वगळणी, फॉर्म नं.८ नाव, पत्ता, तपशील दुरुस्ती, फॉर्म नं.८अ स्थलांतरण हे फॉर्मस् वाटप व स्विकृती करण्यात येत असल्याबाबत माहितीचे अवलोकन करणे.

विषय क्र.३) प्रभाग क्र.४० खराळवाडीमध्ये बालसंस्कार केंद्र व परिक्षा मार्गदर्शन केंद्र इमारत बांधणे लेखाशिर्ष JNNURM / केंद्रशासन योजना या कामातून सदरचे काम करणे आवश्यक आहे. या कामाची पाहणी करुन अंदाजपत्रक तयार करणेत आले असून त्यास सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन २०१५-१६ च्या नुसार दर सुचीनुसार घेण्यात आहे आहे. सदर कामाची प्रशासकीय मान्यता रक्कम रुपये – ३७,५०,०००/- एवढी असून त्याची अंदाजपत्रकीय र.रु.३७,५०,०००/- एवढी येत आहे. सदर अंदाजपत्रकाचा सन २०१६-१७ या वर्षाच्या बजेटमध्ये समावेश करणेत आलेला असून या कामावर होणा-या खर्चाची तरतूद अंदाजपत्रकातील पानांक ६२३ अ.क्र.१८ वर **JNNURM / केंद्रशासन योजना** या लेखाशिर्षावरती अंदाजपत्रकीय रक्कमेच्या रकान्यात शून्य दर्शविणेत आली आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिका सन २०१६-१७ च्या अंदाजपत्रकातील पान क्र.६२३ अनु.क्र.१८ प्रभाग क्र.४० खराळवाडीमध्ये बालसंस्कार केंद्र व परिक्षा मार्गदर्शन केंद्र इमारत बांधणे या कामासाठी र.रु.३७,५०,०००/- इतकी प्रशासकीय मान्यता देणेबाबत विचार करणे.



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी – १८. नगरसचिव विभाग
क्रमांक : नस/४/कावि/५६९/२०१६
दिनांक : १४/१०/२०१६

टिप - प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची विषयपत्रे (डॉकेट्स) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आलेली आहेत.